''सर्वाधिक महत्त्वाचे नियम व अटी'' (''एमआयटीसी'') सर्व क्रेडिट कार्ड्स/कार्डसदस्य/क्रेडिट कार्डाचे अर्जदार/येस बँकेचे ग्राहक/येस बँकेच्या क्रेडिट कार्डात स्वारस्य दाखविणारी सर्वसामान्य जनता यांना लागू आहेत. येस बँकेच्या निर्णयानुसार आणि वेळोवेळी लागू असलेल्या कायद्यानुसार एमआयटीसी मध्ये बदल होऊ शकतात आणि ते कार्डसदस्यांच्या कराराहून (''कार्डसदस्य करार'') अधिक आहेत आणि त्यातील नियम व अटींसोबत वाचावेत. एमआयटीसी आणि कार्डसदस्य करार यात काही विसंगती असल्यास, अन्यथा येथे नमूद केल्याखेरीज, कार्डसदस्य करार अंतिम असेल.

येथे वापरण्यात आलेल्या सर्व ठळक अक्षरातील परंतु व्याख्या न करण्यात आलेल्या संज्ञाचा अर्थ कार्डसदस्य करारात देण्यात आल्यानुसार असेल.

## 1. फी व शुल्क

### ए. वार्षिक सदस्यत्व शुल्क

प्राथमिक व ॲड–ऑन क्रेडिट कार्ड(स) वर वार्षिक सदस्यत्व शुल्क लागू असेल. कार्डसदस्याने कोणत्या ऑफर अंतर्गत येस बँक क्रेडिट कार्ड घेतले आहे त्यानुसार हे शुल्क वेगवेगळे असू शकते. क्रेडिट कार्डासाठी अर्ज करतेवेळी कार्डसदस्याला ते कळविण्यात येईल. कोणत्याही ॲड–ऑन क्रेडिट कार्डावरील शुल्कासह, काही असल्यास, ह्या शुल्काचे बिल कार्डसदस्याच्या क्रेडिट कार्ड खात्याला जारी/नूतनीकरण केल्यानंतर आकारण्यात येईल आणि ज्या महिन्यात ते आकारण्यात आले आहे त्या महिन्याच्या क्रेडिट कार्ड स्टेटमेन्टमध्ये ते दिसेल. क्रेडिट कार्ड बंद केल्यास शुल्क परत केले जाणार नाही.

### बी. रोख अग्रीम शुल्क

कार्डसदस्य भारतात व परदेशात एटीएम्सवरून दिवसाचे चोवीस तास एटीएम्सवरून रोख रक्कम काढण्यासाठी क्रेडिट कार्डाचा उपयोग करू शकतात. अशा प्रकारे काढलेल्या पैशावर 2.5% व्यवहार शुल्क (किमान ₹300) आकारण्यात येईल आणि पुढील महिन्याच्या मासिक विवरणात ते समाविष्ट करण्यात येईल. येस बँकेच्या संपूर्ण निर्णयानुसार व्यवहार शुल्कात बदल केला जाऊ शकतो. सर्व रोख अग्रीम व्यवहारांवर, पैसे काढल्याच्या तारखेपासून ते पूर्ण पैसे भरेपर्यंत रिवॉल्विंग क्रेडिटवर असलेल्या शुल्काइतके वित्त शुल्क (फायनान्स चार्जेस) लागू असेल (कृपया शुल्काचे परिशिष्ट पहावे). लागू वित्त शुल्कात येस बँकेच्या संपूर्ण निर्णयानुसार बदल केला जाऊ शकतो.

### सी. इतर शुल्क

- येस बँके द्वारा कार्डसदस्याला देण्यात आलेल्या खास सेवांसाठी किंवा कार्डसदस्यांने त्याच्या/तिच्या कार्ड खात्याच्या बाबतीत काही हलगर्जीपणा केल्यास त्यासाठी कार्डसदस्याद्वारा वेळोवेळी लागू असतील त्याप्रमाणे शुल्क आणि आकार देय असतील.
- पैसे भरण्याच्या तारखेपर्यंत किमान देय रक्कम न भरल्यास विलंब भरणा शुल्क लागू असेल. विलंब भरणा शुल्क टाळण्यासाठी पैसे भरण्याच्या तारखेपर्यंत येस बँक क्रेडिट कार्ड खात्यात संपूर्ण पैसे भरण्याची आवश्यकता नाही. विलंब भरणा शुल्क ह्याप्रमाणे लागू आहे.
- कृपया हे लक्षात ठेवा की वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) यासह लागू अप्रत्यक्ष कर आणि चालू अप्रत्यक्ष करांनुसार देय असलेली इतर कोणतीही रक्कम आकारण्यात येईल (वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) 1 जुलै 2017 पासून लागू असेल).
- येस बँक, योग्य असेल त्यानुसार, कोणतेही शुल्क किंवा आकार यात वेळोवेळी बदल करण्याचा किंवा नवीन शुल्क अथवा आकार लागू करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. सदर शुल्क किमान 30 दिवसांची सूचना देऊन पुढील तारखेपासून लागू करण्यात येईल.

| विवरणातील थकबाकी | विलंब भरणा शुल्क |
|---|---|
| ₹100/– पेक्षा कमी | काही नाही |
| ₹100/– ते ₹500/– | ₹100/– |
| ₹501/– ते ₹5,000/– | ₹400/– |
| ₹5,001/– ते ₹20,000/– | ₹500/– |
| ₹20,000/– आणि अधिक | ₹700/– |

### डी. व्याजमुक्त कालावधी

कार्डसदस्य ठराविक क्रेडिट कार्डासाठी लागू योजनेच्या आधीन राहून 50 दिवसांपर्यंत व्याजमुक्त क्रेडिट कालावधीचा लाभ घेऊ शकतो (कृपया येथे सोबत जोडण्यात आलेले शुल्काचे परिशिष्ट पहावे). परंतु मागील महिन्यातील थकबाकी देय तारखेला किंवा तत्पुर्वी पूर्णपणे भरली नसल्यास हा कालावधी लागू नसेल. कार्डसदस्याने एटीएम मधून रोख रक्कम काढली असेल तरीही ही बाब लागू होणार नाही.

व्याजमुक्त क्रेडिट कालावधीच्या हिशोबाचे उदाहरण:

समजा क्रेडिट कार्डाचे पैसे भरण्याची अंतिम मुदतीची तारीख 25 मे आहे, आणि मागील महिन्याची थकबाकी पूर्णपणे भरली आहे, तर सवलत कालावधी ह्याप्रमाणे असेल:

1. दिनांक 6 एप्रिल रोजी केलेल्या खरेदीसाठी व्याजमुक्त क्रेडिट कालावधी 6 एप्रिल ते 25 मे = 50 दिवस
2. दिनांक 17 एप्रिल रोजी केलेल्या खरेदीसाठी व्याजमुक्त क्रेडिट कालावधी 17 एप्रिल ते 25 मे = 39 दिवस

## 2. मर्यादा

- येस बँक, संपूर्णपणे आपल्या निर्णयानुसार, कार्डसदस्यांची क्रेडिट मर्यादा आणि रोख पैसे काढण्याची मर्यादा निश्चित करेल (ॲड–ऑन कार्डसदस्याला देखील प्रमुख कार्डसदस्याइतक्याच मर्यादा लागू असतील). क्रेडिट मर्यादा ही कोणत्याही वेळी क्रेडिट कार्ड खात्यावर थकित राहू शकते अशी कमाल रक्कम असेल. ह्या मर्यादा कार्डसदस्याला कार्ड देण्याच्या वेळी आणि मासिक विवरणाद्वारे कळविण्यात येतील. विवरण तयार करताना उपलब्ध क्रेडिट मर्यादेची माहिती देखील मासिक विवरणाचा भाग म्हणून देण्यात येईल. रोख अग्रिम मर्यादा ही, येस बँकेने निश्चित केल्यानुसार किंवा नेमून दिल्यानुसार, कमाल रोख रक्कम किंवा रोखतत्सम असेल जिचा कार्डसदस्य तिच्या/त्याच्या क्रेडिट कार्ड खात्यात उपयोग करू शकतो. रोख मर्यादा ही कार्डसदस्याच्या क्रेडिट मर्यादेचा भाग आहे. लागू रोख अग्रिम मर्यादेसंबंधी माहितीसाठी कृपया शुल्काचे परिशिष्ट पहावे.
- एक सेवा म्हणून, येस बँक कार्डसदस्याने केलेले व क्रेडिट मर्यादेहून अधिक असलेले काही व्यवहार मंजूर करण्याची शक्यता आहे. परंतु, क्रेडिट कार्ड खात्याला मर्यादेहून अधिक रकमेवर 2.5% इतके अधिक मर्यादा शुल्क किंवा ₹500 (ह्यापैकी जे अधिक असेल तितकी) इतकी रक्कम आकारण्यात येईल.
- येस बँकेद्वारा कार्डसदस्याच्या क्रेडिट कार्ड खात्याचा ठराविक कालांतराने आढावा घेण्यात येईल. येस बँक आपल्या स्वत:च्या निर्णयानुसार, अंतर्गत निकषांनुसार कार्डसदस्याची क्रेडिट मर्यादा कमी करण्याची शक्यता आहे. बँक कार्डसदस्याला ताबडतोब त्याची माहिती आणि त्याची कारणे एसएमएस/ई–मेलने कळवेल व त्यानंतर लेखी पत्राद्वारे खात्री देण्यात येईल.
- कार्डसदस्याला कार्डसदस्याची क्रेडिट मर्यादा वाढवून हवी असल्यास, येस बँकेला तशी लेखी विनंती करून आणि कार्डसदस्या/स्यांच्या मिळकतीची घोषणा करणारे आर्थिक दस्तऐवज सादर करून, तो तसे करू शकतो. येस बँक, त्यांच्या स्वत:च्या निर्णयानुसार आणि सदर नव्याने सादर केलेल्या दस्तऐवजांनुसार कार्डसदस्याच्या क्रेडिट मर्यादेत वाढ करू शकते.
- क्रेडिट कार्डाचा उपयोग करणे म्हणजे वेळोवेळी नेमून देण्यात आलेल्या क्रेडिट मर्यादांचा स्वीकार करणे आहे.

## 3. वित्त शुल्क (फायनान्स चार्जेस)

- कार्डसदस्याने त्याची थकबाकीची रक्कम पूर्णपणे परत न करण्याचा निर्णय घेतल्यास अशा प्रसंगी सर्व व्यवहारांवर आणि कार्डसदस्याने घेतलेल्या सर्व रोख अग्रिमवर त्याची परतफेड करेपर्यंत, व्यवहाराच्या तारखेपासून मासिक टक्केवारीच्या दराने वित्त शुल्क (फायनान्स चार्जेस) देय असेल. वित्त शुल्क, देय असल्यास, कार्डावरील संपूर्ण रकमेचा भरणा करेपर्यंत कार्डसदस्याच्या खात्यावर ते बाकी दाखविण्यात येईल.
- सर्व रोख अग्रिम रकमांवर व्यवहाराच्या तारखेपासून ते संपूर्ण पैशाचा भरणा करेपर्यंत वित्त शुल्क लागू असेल.
- कार्डसदस्याने काही थकबाकी पुढे नेल्यास किंवा रोख अग्रिमचा लाभ घेतल्यास, सरासरी दैनंदिन शिल्लक पद्धतीने वित्त शुल्काचा हिशोब करण्यात येईल, आणि ते बाकी असलेल्या रकमेवर आणि नव्या बिलावर, मागील सर्व थकबाकीच्या रकमेचा संपूर्ण भरणा करेपर्यंत लागू असेल.
- कृपया याची नोंद घ्यावी की, वित्त शुल्क आणि इतर शुल्क ह्यात येस बँकेच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो.

**कृपया रिवॉल्विंग क्रेडिटवर लागू वित्त शुल्काचा हिशोब समजण्यासाठी खालील उदाहरण पहा:**

| दिनांक | व्यवहार | रक्कम |
|---|---|---|
| 2 जून | कपड्यांची खरेदी | ₹5000 |
| 14 जून | किराणा खरेदी | ₹1000 |
| 20 जून | स्टेटमेन्टची तारीख | एकुण देय रक्कम = ₹6000; किमान देय रक्कम = ₹300 |
| 10 जुलै | कार्ड खात्यावर पैसे भरले | ₹1000 (क्रेडिट) |
| 14 जुलै | किराणा खरेदी | ₹1000 |
| 20 जुलै | स्टेटमेन्टची तारीख | एकुण देय रक्कम = ₹6347.27; किमान देय रक्कम = ₹317.36 |

कार्डसदस्याने मागील सर्व थकबाकीची रक्कम पूर्णपणे भरली आहे आणि त्याच्या/तिच्या येस बँक क्रेडिट खात्यावर काहीही थकबाकी नाही असे गृहित धरण्यात आले आहे. कार्डसदस्याची स्टेटमेन्टची तारीख दर महिन्याची 20 तारीख आहे. खाली कार्डसदस्याने त्याच्या/तिच्या कार्ड खात्यावर केलेल्या व्यवहारांची यादी देण्यात आली आहे.

20 जुलै रोजीच्या स्टेटमेन्टवर, कार्डसदस्याने देय असलेल्या एकुण रकमेची विगत खालील प्रमाणे दिसेल:

व्याजाचा हिशोब = (थकबाकीची रक्कम x 3.22% दरमहा x 12 महिने x दिवसांची संख्या)/365

ए) ₹5000 वर 2 जून ते 9 जुलै ह्या कालावधीसाठी (38 दिवसांसाठी) 3.22% दराने व्याज = ₹201.14
₹1000 वर 14 जून ते 9 जुलै ह्या कालावधीसाठी (26 दिवसांसाठी) 3.22% दराने व्याज = ₹27.52
₹5000 वर 10 जुलै ते 20 जुलै ह्या कालावधीसाठी (11 दिवसांसाठी) 3.22% दराने व्याज = ₹58.22
₹1000 (नव्या खर्चावर) 14 जुलै ते 20 जुलै ह्या कालावधीसाठी (7 दिवसांसाठी) 3.22% दराने व्याज = ₹7.41
एकुण व्याज ₹294.29

बी) व्याजाच्या रकमेवर 18% दराने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) = ₹52.97
सी) एकुण मुद्दल बाकी = ₹6000 (₹1000 ची नवी खरेदी + मागील महिन्याच्या बिलाच्या कालावधीतील थकबाकी ₹5000)
त्यामुळे एकुण बाकी रक्कम = (ए) + (बी) + (सी) = ₹6347.27

## 4. बिलिंग

- येस बँकेद्वारा कार्डसदस्याला कार्डखात्यात जमा पैसे आणि डेबिट केलेल्या व्यवहाराची माहिती देणारे स्टेटमेन्ट दर महिन्याला पाठविण्यात येईल. येस बँकेद्वारा कार्ड खात्यातील व्यवहारांचे स्टेटमेन्ट निश्चित तारखेला येस बँकेच्या रेकॉर्डवर असलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यावर/ई–मेल त्यावर मेल/ई–मेलने पाठविण्यात येईल. बाकी रक्कम ₹100/– पेक्षा कमी असल्यास आणि मागील स्टेटमेन्टपासून कोणत्याही व्यवहाराचे बिलिंग बाकी नसल्यास, कोणतेही स्टेटमेन्ट जारी केले जाणार नाही.
- येस बँक क्रेडिट कार्डाद्वारा कार्डसदस्यांना रिवॉल्विंग सुविधा देऊ करण्यात येत आहे. कार्डसदस्य क्रेडिट कार्ड स्टेटमेन्टमधील किमान देय रक्कम (एमएडी), संपूर्ण देय रक्कम किंवा एमएडीहून अधिक एकुण देय रकमेच्या काही भागाइतकी रक्कम भरू शकतो. बाकी रक्कम पुढील स्टेटमेन्टमध्ये कॅरी फॉरवर्ड करता येते. सदर पैसे अंतिम देय तारखेच्या आत भरावेत. विलंब भरणा शुल्क टाळण्यासाठी पैसे भरण्याच्या मुदतीच्या तारखेच्या आत येस बँकेच्या खात्यात स्पष्ट निधीचा भरणा करावा. कार्डसदस्याने भरलेले पैसे कार्डखात्यात पैसे भरण्याच्या मुदतीच्या आत जमा व्हावेत यासाठी पैसे भरण्याच्या मुदतीच्या पुरेशा अगोदर स्थानिक धनादेश जमा करावेत अशी विनंती कार्डसदस्यांना करण्यात येत आहे.
- चालू किमान देय रकमेचा हिशोब बाकी रकमेच्या 5% किंवा ₹100 (ह्यापैकी जे अधिक असेल तितकी), अधिक लागू कर आणि ईएमआय (फक्त ईएमआयवर आधारित उत्पादनांसाठी) असा करण्यात येतो. कार्ड सदस्याच्या कार्ड मर्यादेहून अधिक असलेल्या काही थकित रकमेसह मागील स्टेटमेन्टमधील न भरलेली काही किमान देय रक्कम असल्यास, ती कार्डसदस्याच्या चालू किमान देय रकमेत समाविष्ट करण्यात येईल.
- क्रेडिट कार्डाच्या थकित रकमेपैकी काही पैसे भरल्यास ते मिळाल्याचे पुढील स्टेटमेन्टमध्ये दाखविण्यात येईल.
- कार्डसदस्याच्या कार्डावरील थकित रकमेपोटी मिळालेले पैसे, सेवा कर, व्याजाचे शुल्क, सेवा शुल्क आणि फी (सदस्यत्व फी सह), मागील चक्रातील बाकी मुद्दल आणि चालू चक्रातील खरेदी, ह्या क्रमाने वसूल केले जातील.
- कार्ड खात्यासाठी खालील पैकी कोणत्याही पद्धतीने पैसे भरता येतील:

⇨ कार्डसदस्याचे येस बँकेत खाते असल्यास, तो/ती नेटबँकिंग आणि/किंवा येस बँकेच्या एटीएम्स द्वारे पैसे भरू शकेल. सदर कार्डसदस्य स्थायी सूचना सुविधेचा देखील लाभ घेऊ शकतो, ज्यामध्ये कार्डसदस्याच्या येस बँकेतील खात्यातून कार्डसदस्याच्या कार्ड खात्यात देय तारखेला पैसे आपोआप जमा करण्यात येतील.

⇨ कार्डसदस्य दुसऱ्या बँकेच्या खात्यातून एनईएफटी फंड ट्रान्सफर पद्धतीने पैसे हस्तांतरित करू शकतो **(आयएफसी कोड YESB0CMSNOC चा उपयोग करा)**, किंवा इतर बँकांच्या नेटबँकिंग खात्यातून बिल डेस्क सुविधेचा उपयोग करून पैसे हस्तांतरित करू शकतो.

⇨ कार्डसदस्य येस बँकेच्या शाखा आणि एटीएम्समध्ये असलेल्या येस बँकेच्या क्रेडिट कार्ड ड्रॉप बॉक्समध्ये पैसे भरण्याचे इतर इन्स्ट्रुमेन्ट (धनादेश किंवा ड्राफ्ट) टाकून पैसे भरू शकतो. धनादेश/ड्राफ्ट येस बँक क्रेडिट कार्ड क्रमांक XXXX XXXX XXXX XXXX ह्या नावाने देय असावा.

⇨ कार्डसदस्य येस बँकेच्या शाखांमध्ये रोख रकमेद्वारे देखील पैसे भरू शकतो. क्रेडिट कार्ड खात्यात रोख पैसे भरण्यासाठी लागू शुल्कासाठी कृपया शुल्काचे परिशिष्ट पहावे.

- कार्डसदस्याच्या पत्रव्यवहाराच्या पत्यात/ई–मेल पत्यात काही बदल झाल्यास, कार्डसदस्याला स्टेटमेन्ट वेळेवर मिळावे यासाठी कार्डसदस्याने ताबडतोब येस बँकेशी संपर्क साधून ताजी माहिती देण्याची सूचना करण्यात येत आहे.
- स्टेटमेन्ट/बिलिंगसंबंधी वाद: काही तृटी असल्यास कार्डसदस्याने स्टेटमेन्टच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत येस बँकेला त्याची लेखी माहिती न कळविल्यास स्टेटमेन्टमधील सर्व माहिती अचूक आहे असे समजण्यात येईल. सदर माहिती मिळाल्यावर, येस बँक तपासणी बाकी असेपर्यंत तात्पुरते शुल्क वजा करू शकते. नंतर चौकशी पूर्ण झाल्यानंतर जर सदर कार्डसदस्याच्या खात्यावर सदर शुल्काचे दायित्व असल्यास, पुढील स्टेटमेन्टमध्ये शुल्काच्या भरपाईच्या विनंतीच्या शुल्कासह सदर शुल्क पुन्हा आकारण्यात येईल.
- कृपया याची नोंद घ्यावी की, दर महिन्याला कमीत कमी पैसे भरण्यामुळे अनेक वर्ष परतफेडीची रक्कम वाढत जाते व तुमच्या थकबाकी रकमेवर परिणामस्वरूप व्याज भरावे लागेल.
- बिलिंग आणि स्टेटमेन्टसंबंधी काही वाद असल्यास, कार्डसदस्य येस बँक क्रेडिट कार्ड विभागाकडे चौकशी करू शकतो.

⇨ 24X7 येस टच ग्राहक सेवा क्रमांक: 1800 103 1212/022–49350000

⇨ पत्रव्यवहाराद्वारे – येस बँक लिमिटेड, वन इंडिया बुल्स पार्क, क्र. 14, 3रा मुख्य रस्ता, अंबत्तूर इंडस्ट्रिअल इस्टेट, अंबत्तूर, चेन्नाई – 600 058.

⇨ ई–मेलने: yestouchcc@yesbank.in

## 5. पैसे वेळेवर न भरणे आणि परिस्थिती

जर कार्डसदस्याने पैसे भरण्याच्या मुदतीच्या तारखेच्या आत किमान देय रक्कम न भरल्यास, भारतीय रिझर्व बँकेद्वारा (आरबीआय)

अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कार्ड ब्युरोला देण्यात येणाऱ्या मासिक अहवालात ते खाते ''थकित'' खाते म्हणून दर्शविण्यात येईल. किमान देय रक्कम न भरण्यामुळे क्रेडिट कार्ड सेवा खंडित होऊ शकते. कार्डसदस्याला पुढील स्टेटमेन्टमध्ये त्याची/तिची थकबाकी भरण्याची आठवण करून देण्यात येईल. कार्डसदस्याने आवश्यक पैसे भरल्यास, कार्ड ब्यूरोला पाठविण्यात येणाऱ्या पुढील महिन्याच्या ताज्या माहितीत 'चालू' अशी त्याच्या/तिच्या रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात येईल.

पैसे वेळेवर न भरल्यास, कार्डसदस्यला योग्य संपर्कसाधनांद्वारे कार्ड खात्यावर असलेली थकबाकी भरण्यास वेळोवेळी स्मरणपत्र पाठविण्यात येईल, आणि/किंवा आठवण करण्यासाठी, पाठपुरावा आणि पैसे वसूल करण्यासाठी तिसऱ्या पक्षाची मदत घेण्यात येईल.

## 6. तारणाचा अधिकार

येस बँकेने मागणी केल्यानंतर देखील जर कार्डखात्यावरील थकबाकीची रक्कम नेमून दिलेल्या वेळेपुर्वी परत न केल्यास, कोणत्याही वेळी कोणत्याही सूचनेशिवाय, कार्डसदस्याच्या आणि/किंवा ॲड–ऑन कार्डसदस्याच्या मालकीच्या सर्व पैशाचे तारण ठेवण्याचा आणि त्यातून वसुली करण्याचा अधिकार येस बँकेला आहे.

## 7. कार्डसदस्यत्व प्रलंबित/रद्द करणे

- येस बँकेला खालील पत्यावर लेखी कळवून कार्डसदस्य कोणत्याही वेळी कार्डसदस्यत्व रद्द करू शकतो:
- **येस बँक लिमिटेड, वन इंडिया बुल्स पार्क, क्र. 14, 3रा मुख्य रस्ता, अंबत्तूर इंडस्ट्रिअल इस्टेट, अंबत्तूर, चेन्नाई – 600 058** व त्यासोबत कार्डाचे तिरपे 4 तुकडे करून जोडावेत. लेखी विनंतीनुसार सर्व कार्डस व ॲड–ऑन कार्डस रद्द करण्यात येतील. कापरेली कार्डस प्राप्त झाल्यानंतरच आणि कार्डखात्यावर असलेली सर्व थकबाकीची रक्कम भरल्यानंतरच खंडिकरण लागू होईल. कोणतेही सदस्यत्व किंवा नूतनीकरणाचे शुल्क प्रो–रेटा पद्धतीने परत केले जाणार नाही.
- क्रेडिट कार्डाचा उपयोग करताना येस बँकेच्या काही असाधारण व अपवादात्मक व्यवहार पद्धती निदर्शनास आल्यास, कार्डावरील व्यवहाराच्या वैधतेची पडताळणी करण्यासाठी येस बँकेद्वारा त्यांच्या रेकॉर्डसवर उपलब्ध असलेल्या कार्डसदस्याच्या नोंदणीकृत दूरध्वनी क्रमांकावर कार्डसदस्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
- येस बँकेला कार्डसदस्याशी संपर्क साधता आला नाही तर, कार्डसदस्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून आणि/किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव येस बँकेला वाजवी प्रमाणात तसे करणे आवश्यक वाटल्यास येस बँक कोणत्याही पुढील सूचनेशिवाय क्रेडिट कार्डाचा उपयोग करण्यावर बंधने घालू शकते/खंडित करू शकते.
- पैसे भरण्याच्या बाबतीत कार्डसदस्याने हलगर्जीपणा केल्यास किंवा देण्यात आलेल्या कार्ड मर्यादेचे उल्लंघन केल्यास, येस बँक, क्रेडिट कार्डाची सुविधा प्रलंबित करू शकते. कार्डसदस्य करार संपुष्टात आल्यानंतर किंवा कार्ड खाते प्रलंबित करण्यात आल्यास, क्रेडिट कार्डाचा उपयोग करू नये. अशा परिस्थितीत, कार्डसदस्याने ताबडतोब (कोणत्याही हलगर्जीपणाच्या किंवा कायद्यांतर्गत इतर सूचना आवश्यक असल्याच्या अधीन राहून) येस बँकेला क्रेडिट कार्ड खात्यात असलेली संपूर्ण थकबाकीची रक्कम भरावी. ह्यात कार्डसदस्यत्व करारांतर्गत येस बँकेला देणे असलेल्या सर्व रकमांचा व त्याचबरोबर क्रेडिट कार्ड खात्याला अजून आकारण्यात न आलेल्या सर्व व्यवहारांच्या आणि इतर रकमांचा समावेश आहे. कार्डसदस्याने सर्व थकित रकमांची संपूर्ण भरपाई केल्याखेरीज क्रेडिट कार्ड बंद झाले असे गृहित धरले जाणार नाही.
- कार्डसदस्याचा मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास, कार्डसदस्याला देण्यात आलेले क्रेडिट कार्ड व त्याप्रमाणे ॲड–ऑन कार्डसदस्याला देण्यात आलेले क्रेडिट कार्ड आपोआप रद्द होईल. कोणत्याही सरकारी/नियामक मंडळाने काही सूचना दिल्यास देखील क्रेडिट कार्ड प्रलंबित होण्यास लागू असेल. मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास, जसे असेल त्याप्रमाणे, क्रेडिट कार्ड खात्यावर बाकी असलेल्या सर्व रकमा ताबडतोब देय आहेत असे गृहित धरण्यात येईल आणि सर्व थकबाकीच्या रकमा भरण्याच्या कार्डसदस्याच्या जबाबदारीच्या बाबतीत कोणताही भेदभाव न करता, संबंधित लागू कायद्यांनुसार येस बँक सदर रक्कम वसूल करण्यास पात्र असेल.

## 8. कार्ड हरवणे/चोरी होणे/त्याचा गैरवापर

- कार्डसदस्याने जर मुख्य किंवा कोणतेही अधिक क्रेडिट कार्ड गहाळ झाले, हरवले, चोरीला गेले, खराब झाले, मिळणे प्राप्त असताना मिळाले नाही किंवा कार्डसदस्याच्या परवानगीशिवाय क्रेडिट कार्डाचा उपयोग केला जात आहे अशी त्याला/तिला शंका आल्यास कार्डसदस्याने आमच्या 24x7 येस टच कस्टमर केअर क्रमांकावर (पृष्ठ 9 वर नमूद केल्यानुसार) ताबडतोब त्याची माहिती कळवावी.
- कोणताही अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहार झाल्यास असा व्यवहार झाल्यानंतर कार्डसदस्याने बँकेला लवकरात लवकर कळविले पाहिजे. कारण बँकेला कळविण्यासाठी जेवढा जास्त वेळ लागेल तेवढी बँक/कार्डसदस्य यांचे नुकसान होण्याची जोखीम जास्त होईल.
- **ए. ग्राहकाचे मर्यादित उत्तरदायित्व**
- पुढील प्रकरणांमध्ये अनधिकृत व्यवहारांमुळे होणाऱ्या हानीसाठी ग्राहक जबाबदार असेल.
- जेव्हा पेमेन्ट क्रेडेन्शियल ग्राहकाकडून दुसऱ्याला सांगण्यात येण्यासारख्या निष्काळजीपणामुळे नुकसान होते तेव्हा हा अनधिकृत व्यवहार बँकेला कळविण्यात येण्यापर्यंतच्या काळामध्ये होणारे संपूर्ण आर्थिक नुकसान ग्राहकाला सहन करावे लागेल.
- जेव्हा अनधिकृत बँकिंग आर्थिक व्यवहाराची जबाबदारी बँकेवरही नसते आणि ग्राहकावरही नसते, परंतु ती सिस्टिममध्ये इतर ठिकाणी असते आणि (बँकेकडून संपर्क साधला गेल्यापासून चार ते सात कामकाजाच्या दिवसांचा) विलंब असा आर्थिक व्यवहार

कळविण्याबाबत ग्राहकाकडून झालेला असतो तेव्हा सदर प्रत्येक आर्थिक व्यवहाराची ग्राहकाची जबाबदारी ही आर्थिक व्यवहाराचे मूल्य किंवा कोष्टक 1 मध्ये नमूद केलेली रक्कम, यांच्यापैकी जी कमी असेल तेवढ्या मर्यादेत असेल.

**कोष्टक 1**

| खात्याचा प्रकार | कमाल जबाबदारी (₹) |
|---|---|
| ₹5 लाख मर्यादेपर्यंतची क्रेडिट कार्ड्स | ₹10,000 |
| ₹5 लाख मर्यादेपेक्षा जास्त क्रेडिट कार्ड्स | ₹25,000 |

जेव्हा दोष बँकेकडेही नसतो किंवा ग्राहकाकडेही नसतो, परंतु सिस्टिममध्ये इतर ठिकाणी असतो अशा वेळेस तृतीयपक्षाकडून होणाऱ्या चुकांची ग्राहकाची जबाबदारी खालील कोष्टक 2 मध्ये साररूपाने सांगण्यात येत आहे:

**कोष्टक 2**

**ग्राहकाच्या जबाबदारीचा सारांश**

| ग्राहकाच्या जबाबदारीचा सारांश संपर्क प्राप्त झाल्याच्या तारखेपासून फसवणुकीचा आर्थिक व्यवहार कळविण्यासाठी घेण्यात आलेला वेळ | ग्राहकाची जबाबदारी (₹) |
|---|---|
| कामकाजाच्या 3 दिवसापर्यंत<br>कामकाजाच्या 4 ते 7 दिवसापर्यंत | शून्य उत्तरदायित्व<br>आर्थिक व्यवहाराचे मूल्य किंवा कोष्टक 1 मध्ये नमूद केलेली रक्कम यापैकी कमी असेल ते. |
| कामकाजाच्या 7 दिवसानंतर | आर्थिक व्यवहाराचे संपूर्ण मूल्य (बँकेवर शून्य उत्तरदायित्व) |

- कोष्टक 2 मध्ये नमूद केलेली कामकाजाच्या दिवसांची संख्या हे ग्राहकाच्या मूळ शाखेच्या कामकाजाच्या वेळापत्रकानुसार, त्या बाबतचा पत्रव्यवहार मिळण्याची तारीख वगळता असणारे दिवस अशी मोजण्यात येईल.
- क्रेडिट कार्ड गहाळ आणि चोरी होण्याच्या प्रकरणांमधील वर नमूद केलेले निकष कार्डसदस्याकडून पूर्ण होत असले तरी कार्डसदस्याने ही चोरी पोलिसांकडे कळविणे, एफआरआय नोंदविणे आणि पोलिसांकडे तक्रार नोंदविल्याच्या पोचपावतीची प्रत बँकेकडे सादर करणे आवश्यक आहे.
- कार्डसदस्याच्या किंवा ॲड–ऑन कार्डसदस्याच्या संमतीने एखाद्या व्यक्तीने पिन किंवा कार्ड मिळवून त्याव्यक्तीने कार्डाचा दुरूपयोग केल्यास त्यास कार्डसदस्य जबाबदार असेल.
- जर कार्डसदस्याने गैरव्यवहार केल्यास, कार्डसदस्य सर्व नुकसानीस जबाबदार असेल. कार्डसदस्याने वाजवी काळजी न घेता व्यवहार केल्यास, होणाऱ्या सर्व नुकसानीस कार्डसदस्य जबाबदार असेल.
- येस बँक कार्डसदस्याच्या किंवा कोणाही ॲड–ऑन कार्डसदस्याच्या कोणत्याही संदर्भाशिवाय, पोलीस किंवा इतर संबंधित प्राधिकाऱ्यांना, कार्ड किंवा पिन हरवणे, चोरी होणे किंवा त्याचा गैरवापर होण्याशी येस बँकेला संबंधित आहे असे वाटणारी कोणतीही माहिती देण्याची शक्यता आहे.
- एकदा कार्ड हरवल्याचे कळविण्यात आल्यानंतर, कार्डसदस्याला नंतर ते सापडल्यास कोणत्याही परिस्थितीत त्याचा उपयोग करू नये. कृपया मॅग्नेटिक आणी ईएमव्ही चिपवर कार्डाचे अनेक तुकडे करून ते नष्ट करावे.
- कार्डसदस्याला क्रेडिट कार्डासोबत वापरण्यासाठी जारी करण्यात आलेला पिन (पर्सनल आयडेन्टिफिकेशन क्रमांक) किंवा कार्ड सदस्याने निवडलेला कोणताही पिन फक्त कार्डसदस्याला माहित असला पाहिजे. तो कार्डसदस्याच्या व्यक्तिगत उपयोगासाठी आहे आणि तो अहस्तांतरणीय आहे आणि काटेकोरपणे गोपनिय आहे. कोणत्याही स्वरूपात, ठिकाणी किंवा पद्धतीने पिन लेखी स्वरूपात ठेवू नये, ज्यामुळे त्याचा तिसऱ्या व्यक्तीला उपयोग करणे शक्य होईल. पिन इतर कोणाही तिसऱ्या पक्षाला, येस बँकेचा कर्मचारी किंवा मर्चन्ट आस्थापनेचा कर्मचारी यांना, कोणत्याही परिस्थितीत किंवा कोणत्याही प्रकारे, स्वेच्छेने किंवा अन्यथा, सांगू नये. कार्डसदस्याने पिनच्या बाबतीत काही तडजोड केल्यास, त्यास येस बँक आणि/किंवा त्यांचे कर्मचारी/कामगार जबाबदार राहणार नाहीत.

## 9. तक्रार निवारण

येस बँकेच्या कोणत्याही ॲक्सेस चॅनल्सद्वारा देण्यात आलेल्या सेवेमुळे आणि/किंवा प्रतिसादामुळे तुमचे समाधान न झाल्यास, तुम्ही आमच्याशी 1800 103 1212 (टोल फ्री)/022-49350000 ह्या क्रमांकावर संपर्क साधू शकता किंवा आम्हाला **yestouchcc@yesbank.in** येथे ई-मेल पाठवू शकता. कोणत्याही अधिक निराकरणासाठी, तुम्ही आमचे प्रमुख नोडल अधिकारी, श्री. रतन कुमार केश, यांच्याशी येस बँक लिमिटेड, 22वा मजला, आयएफसी, येस बँक टॉवर, एल्फिन्स्टन रोड (पश्चिम), मुंबई – 400 013, ई-मेल: principal.nodalofficer@yesbank.in येथे संपर्क साधू शकता किंवा सोमवार ते शुक्रवार सकाळी 09.30 ते सायंकाळी 5.30 ह्या वेळेत 0124-4619044 ह्या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

तुम्ही वरील माध्यमांकडे तुमची तक्रार दाखल केल्यानतर 1 (एक) महिन्याचे आत तुम्हाला काही प्रतिसाद न मिळाल्यास, किंवा तुम्हाला देण्यात आलेल्या प्रतिसादामुळे तुमचे समाधान न झाल्यास, तुम्ही स्वतंत्र आढाव्यासाठी बँकिंग लोकायुक्तांना लिहू शकता. कृपया बँकिंग लोकायुक्त योजनेसंबंधी अधिक माहितीसाठी www.rbi.org.in येथे तक्रार निवारण वेबपेज पहा.

## 10. प्रगटीकरण व महत्त्वाची नियामक माहिती

- कार्डसदस्य याचा स्वीकार करत आहे की, विद्यमान व्यावसायिक पद्धतींनुसार बँक कार्डसदस्याला कोणतीही सूचना न देता कोणत्याही क्रेडिट ब्यूरो (विद्यमान किंवा भविष्यातील) क्रेडिट कार्ड(स)संबंधी कोणतीही माहिती वेळोवेळी देऊ शकते.
- कार्डसदस्याकडे असणारे क्रेडिट कार्ड हे कार्डसदस्याची पात्रता आणि बँकेचा अधिकार यांच्या आधारे अपग्रेड/डाऊनग्रेड होऊ शकते. याशिवाय कार्डसदस्याला देण्यात आलेल्या क्रेडिट लिमिटची सुधारणा मर्यादेपलिकडे जाऊ शकणारा आणि मुदतवाढ होऊ शकणारा देखील असते
- द क्रेडिट कार्ड इन्फर्मेशन ब्यूरो इंडिया लिमिटेड (सीआयबीआयएल) हा वित्तीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करणारा भारत सरकार आणि भारतीय रिझर्व बँक यांचा उपक्रम आहे. ह्या उपक्रमात सहभागी असलेल्या सर्व बँका आणि वित्तीय संस्थांना ग्राहकांची माहिती सिबिल/इतर क्रेडिट ब्यूरो यांना द्यावी लागते आणि ही माहिती क्रेडि इन्फर्मेशन कंपनीज रेग्युलेशन कायदा, 2005 अंतर्गत द्यावी लागते. ह्याकारणास्तव आम्ही कार्डसदस्यांना कळवू इच्छितो की कार्डसदस्याने क्रेडिट कार्ड(स) संदर्भात योग्य सूचना देऊन देखील कार्डाच्या पैशांची थकबाकी असल्यास व त्याबाबतीत काही हलगर्जीपणा केल्यास येस बँकेद्वारा त्याची माहिती सिबिल आणि इतर कोणत्याही क्रेडिट ब्यूरो (विद्यमान किंवा भविष्यातील) यांना दिली जाऊ शकते. थकबाकी असलेल्या कार्ड खात्यात काही पैसे भरल्यास, येस बँकेला पैसे मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत सिबिल/इतर क्रेडिट ब्यूरोज यांच्याकडे त्यासंदर्भातील कोणतीही नवी माहिती/सुधारित माहिती प्रदर्शित होईल.
- येस बँकेने अवैध असल्याचे स्पष्ट केलेला बिलाच्या बाबतीत वाद कार्डसदस्याने निर्माण केल्यास किंवा येस बँकेने सदर वादासाठी अंतिम मुदत निश्चित केल्यानंतर कार्डसदस्याने तो पुन्हा निर्माण केल्यास आणि/किंवा सदर वाद पिन किंवा वन टाईम पासवर्डच्या उपयोग करून केलेल्या व्यवहाराशी संबंधित असल्यास तरी सुद्धा, अपराधी कार्डसदस्याची माहिती ब्यूरोला कळविण्याचा अधिकार येस बँक राखून ठेवत आहे.
- भारतीय रिझर्व बँकेच्या (आरबीआय) लागू मार्गदर्शक प्रणालींनुसार येस बँक, त्याच्या स्वत:च्या निर्णयानुसार क्रेडिट कार्डसंबंधी कोणतेही कामकाज, भारतातील किंवा परदेशातील आणि येस बँक समुहातील व्यवसाय किंवा तिसरा पक्ष असलेल्या येस बँकेने नेमलेल्या सेवा पुरवठादाराला नेमून देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे. येस बँक कोणत्याही खास संमतीशिवाय क्रेडिट कार्डाच्या कामाकाजाशी संबंधित कार्यासाठी सेवा पुरवठादारांना कार्डसदस्या(स्यां)चा तपशिल देऊ शकते.
- आम्ही कार्डसदस्याला सांगू इच्छितो की, येस बँक आपल्या स्वत:च्या निर्णयानुसार, तक्रारीशी संबंधित संवाद असल्यास किंवा पैसे वसूलीशी संबंधित संवाद असल्यास किंवा येस बँकेला योग्य वाटणारा इतर काही संवाद असल्यास, कार्डसदस्य आणि येस बँकेचा प्रतिनिधी यांच्यातील संवाद रेकॉर्ड करण्याची शक्यता आहे.
- ठराविक क्रेडिट कार्ड प्रकारांमध्ये कार्डासाठी मोफत विमा संरक्षण उपलब्ध आहे. पॉलिसीचे संरक्षण क्रेडिट कार्ड सुरू झाल्याच्या तारखेपासून सुरू होते. अधिक माहितीसाठी आणि नियम व अटींसाठी, कृपया येस बँकेची वेबसाईट पहावी.
- वेळोवेळी येस बँकेद्वारा कार्डसदस्यांना महत्त्वपूर्ण फायदे देऊ करणारी विविध वैशिष्ट्ये/उत्पादने/प्रचारसंबंधी ऑफर्स यांची माहिती कळविली जाते आणि त्यासाठी ते तिसऱ्या पक्षाच्या सेवांचा उपयोग करण्याची शक्यता आहे. कार्डसदस्याला अशा प्रकारच्या टेलिफोन कॉल्स/एसएमएस द्वारा माहिती कळविली जावी अशी त्याची/तिची इच्छा नसल्यास, त्याने/तिने 'डू नॉट कॉल' सेवेसाठी नोंदणी करावी. 'डू नॉट कॉल' सेवेसाठी नोंदणी करण्यासाठी कृपया ग्राहक सेवेशी संपर्क साधावा किंवा **www.yesbank.in** येथे भेट द्यावी.
- तुमचा भारताबाहेरील येस बँक क्रेडिट कार्डाचा व्यवहार काटेकोरपणे भारतीय रिझर्व बँक आणि परदेशी चलन व्यवस्थापन कायदा, 1999 नुसार करावा. भारतात राहणाऱ्या कार्डसदस्याला सूचित करण्यात येत आहे की भारताबाहेर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे/इंटरनेट ट्रेडिंग पोर्टलद्वारे परदेशातील परदेशी चलनातील व्यवहारासाठी कोणत्याही स्वरूपात थेट पैसे स्वीकारणे आणि /व्यवहार करणे/पैसे देण्यास प्रतिबंध आहे आणि अशा प्रकारचा व्यवहार करणारा कार्डसदस्य नो युवर कस्टमर (केवायसी) नियम /ॲन्टी मनी लॉन्डरिंग (एएमएल) परिमाणे याच्याशी संबंधित नियमांच्या उल्लंघनाबरोबर परदेशी चलन व्यवस्थापन कायदा (एफईएमए), 1999चे उल्लंघन केल्याबद्दल तो/ती/ते कार्यवाहीस पात्र असतील. येस बँकेच्या क्रेडिट कार्डाचा उपयोग करण्याद्वारे एक्सचेंज कंट्रोल नियमांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केल्यास, ती पूर्णपणे येस बँकेच्या क्रेडिट कार्डसदस्याची जबाबदारी असेल.
- इंटरनेटवर किंवा अन्यथा प्रतिबंधक वस्तूंच्या खरेदीसाठी उदा. लॉटरीची तिकिटे, प्रतिबंध असलेली किंवा कायदेशिर प्रतिबंध असलेली मासिके, जुगारातील सहभाग, कॉल बॅक सेवांसाठी पैसे देणे आणि/किंवा ज्यासाठी परदेशी चलन काढण्याची परवानगी नाही अशा कोणत्याही वस्तू/कामासाठी आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डाचा उपयोग करता येणार नाही.

<table>
<tr><th colspan="7">शुल्काचे परिशिष्ट – येस बँक क्रेडिट कार्ड्स</th></tr>
<tr><td></td><td colspan="6">येस प्रॉस्परिटी बिझिनेस क्रडिट कार्ड</td></tr>
<tr><td>दाखल होण्याचे शुल्क</td><td colspan="6">काही नाही</td></tr>
<tr><td>वार्षिक सदस्यत्व शुल्क (पहिले वर्ष व नूतनीकरण)</td><td colspan="6">₹2,500/- + लागू होणारे कर<br>(पहिल्या वर्षासाठी, पहिल्या विवरणात शुल्क आकारले जाते. प्रत्येक नूतनीकरणासाठी, नूतनीकरणानंर पहिल्या विवरणात वार्षिक शुल्क आकारले जाते)</td></tr>
<tr><td>वार्षिक शुल्क रद्द होण्यासाठी खर्चाच्या अटी.<br>(फक्त किरकोळ खर्चाच्या व्यवहारावर लागू)</td><td colspan="6">अॅन्युअल फि रिव्हर्सल कंडिशन्समध्ये लागू नाही</td></tr>
<tr><td>व्याजमुक्त कालावधी</td><td colspan="6">50 दिवस पर्यंत</td></tr>
<tr><td>किमान देय रक्कम (एमएडी)</td><td colspan="6">विवरणानुसार देय असलेल्या रकमेच्या 5% किंवा ₹200, ह्यापैकी जे अधिक असेल ते.</td></tr>
<tr><td>रोख अग्रिम मर्यादा</td><td colspan="6">क्रेडिट मर्यादेच्या 30%</td></tr>
<tr><td>अॅड–ऑन कार्ड शुल्क</td><td colspan="6">दाखल होण्याचे शुल्क नाही, वार्षिक शुल्क नाही<br>(जास्तीत जास्त 3 पर्यंत अॅड–ऑन कार्डस जारी करता येतील)</td></tr>
<tr><td>रिवॉल्विंग क्रेडिट, रोख अग्रिम आणि/किंवा थकबाकी रकमेवर वित्तीय शुल्क</td><td colspan="6">येस बँक चालू खाते, बचत खातेधारक किंवा बिझिनेस बँकिंग रिलेशनशिपसाठी – दरमहा 2.99% (म्हणजे 35.88% वार्षिकीकृत)<br>इतर – दरमहा 3.22% (म्हणजे 38.64% वार्षिकीकृत)</td></tr>
<tr><td rowspan="2">विलंब भरणा शुल्क (एलपीसी)<br>(प्रत्येक विवरणात, विवरणातील थकबाकीनुसार)</td><td>विवरणातील थकबाकीसाठी</td><td>< ₹100</td><td>₹101-500</td><td>₹501-5,000</td><td>₹5,001-20,000</td><td>>₹20,000</td></tr>
<tr><td>एलपीसी</td><td>काही नाही</td><td>₹100</td><td>₹400</td><td>₹500</td><td>₹700</td></tr>
<tr><td>ओव्हरलिमिट शुल्क</td><td colspan="6">अधिक मर्यादा रकमेच्या 2.5% किंवा ₹500, ह्यापैकी जे अधिक असेल तितके</td></tr>
<tr><td>रोख अग्रिम शुल्क</td><td colspan="6">काढलेल्या रकमेच्या 2.5% किंवा ₹300, ह्यापैकी जे अधिक असेल तितके</td></tr>
<tr><td>पेमेन्ट रिटर्न शुल्क: धनादेश/ऑटोपे</td><td colspan="6">₹350 (धनादेख किंवा ऑटोपे रिटर्नच्या एका घटनेसाठी)</td></tr>
<tr><td>रिवॉर्ड रिडेंप्शन शुल्क</td><td colspan="6">₹100 एका रिडेंप्शनच्या विनंतीसाठी (खाससाठी रद्द)</td></tr>
<tr><td>भारतातील सर्व इंधन मध्ये इंधन अधिभार रद्द<br>(सेवा कर आणि इंधन करावर लावलेला इतर अधिभार रद्द केला जाणार नाही)</td><td colspan="6">फक्त ₹400/- ते ₹5,000 च्या व्यवहारावर लागू. विवरणाच्या चक्रात कमाल अधिभार रद्द प्रिफर्ड साठी ₹500/-</td></tr>
<tr><td>हरवलेले, चोरीला गेलेले किंवा खराब झालेल्या कार्डासाठी बदली कार्ड देणे</td><td colspan="6">₹100 (एका घटनेसाठी)</td></tr>
<tr><td>परदेशी चलन परिवर्तन शुल्क</td><td colspan="6">2.5% + लागू होणारे कर</td></tr>
<tr><td>बाहेरगावच्या धनादेशासाठी परिवर्तन शुल्क:</td><td colspan="6">₹25 (एका बाहेरगावच्या धनादेशासाठी)</td></tr>
<tr><td>विवरणाची दुसरी प्रत (6 महिन्यापेक्षा जुने विवरण)</td><td colspan="6">₹100 एका स्टेटमेन्टसाठी</td></tr>
<tr><td>क्रेडिट कार्डाचे पैसे भरण्यासाठी वायबीएल शाखेत रोख पैसे भरणे</td><td colspan="6">₹100 (01/01/2017 रोजी किंवा त्यानंतर भरलेल्या रोख रकमेसाठी आकारावे)</td></tr>
<tr><td>रेल्वे तिकीटांची खरेदी किंवा कॅन्सलेशनसाठी शुल्क</td><td colspan="6">आयआरसीटीसी/भारतीय रेल्वे यांनी सूचित केल्यानुसार</td></tr>
<tr><td>वस्तू आणि सेवा कर (जीएसटी)</td><td colspan="6">18% (सर्व शुल्क व आकारावर लागू)</td></tr>
</table>

www.yesbank.in

**येस बँक लिमिटेड**

वन इंडिया बुल्स पार्क, क्र. 14, 3रा मुख्य रस्ता, अंबत्तूर इंडस्ट्रिअल इस्टेट, अंबत्तूर, चेन्नाई – 600 058

24x7 येस टच ग्राहक सेवा क्रमांक:

1800 103 1212 (टोल फ्री भारतातील मोबाईल व लँडलाईन्ससाठी)

+91 22 4935 0000 (भारताबाहेरून संपर्कासाठी)

वेबसाईट: www.yesbank.in

ई–मेलचा पत्ता: yestouchcc@yesbank.in

v2.0